सुवर्ण महोत्सवी वर्ष
(१९७२-२०२२)

# प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा
# मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग
# सामुदायिक विज्ञान महाविद्यालय वनामकृवि, परभणी

जा.क्र.एलपीपीएस/ ५३
दि. ५.४.२०२२

## शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ प्रवेशासंबंधी परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत असणाऱ्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयातील मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभागात असणाऱ्या प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.या प्रवेश प्रक्रियेत प्ले सेक्शन (वयोगट २ ते ३ वर्षे विद्यार्थ्यासाठी प्रवेश अर्ज विक्री दि. १ एप्रिल-२१ **एप्रिल २०२२** दरम्यान सुरू राहणार असून प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या कार्यालयात सकाळी ९:३० ते १.०० दुपारी २:३० ते ४:३० या वेळेत प्रवेश अर्ज विक्री चालू राहिल तथा ते स्वीकारण्यात येतील. **दि. २१ एप्रिल २०२२ रोजी मात्र अर्ज स्वीकारण्याची वेळ सकाळी ९:३० ते १.०० दुपारी २:३० ते ३:३० या प्रमाणे असेल. प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर अर्जासोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रात कोणत्याही प्रकारचा फेरफार करता येणार नाही. अपूर्ण अर्ज प्रवेश प्रक्रियेमध्ये बाद ठरविण्यात येतील .**

- मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभागासाठी प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेचा प्रत्येक विद्यार्थी अनमोल असल्याने ही प्रवेश प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पाडण्यात येईल.
- कोरोना प्रकोपात विशेषतः बालकांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांच्या सर्वांगीण विकासावर होणारे नुकसान टाळण्यासाठी गतवर्षी या शाळेतर्फे **माझे घर – माझी शाळा** हा ऑनलाईन उपक्रम राबवण्यात आला होता.या उपक्रमाला बालकांचा व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे यावर्षीही शासन पूर्व प्राथमिक शाळा सुरू करण्याबाबत निर्देश देणार नाही तोपर्यंत हाच उपक्रम राबविण्यात येणार आहे.
- या प्रवेश प्रक्रियेत मागील वर्षी म्हणजेच सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधीत कक्षात (बड्स सेक्शन,फ्लॉवर्स सेक्शन व ब्रिज सेक्शन) प्रवेश घेण्याकरिता प्रथम प्राधान्य देण्यात येऊन त्यानंतर उर्वरित जागा नवीन प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना खुल्या करण्यात येतील.
- सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या सकाळच्या सत्रातील प्ले सेक्शन (वयोगट २ ते ३वर्षे ) व विकासात्मक कमतरता असणा-या विद्यार्थ्यांचे (८) नव्याने प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या निर्धारीत नियमाप्रमाणे केवळ विकासात्मक कमतरता असणा-या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर कक्षात नव्याने प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया लॉटरी पध्दतीने वयाच्या चढत्या क्रमानुसार निश्चीत करण्यात आलेली आहे. प्ले सेक्शनच्या एकूण निर्धारित जागांपैकी ५० टक्के जागा या वनामकृवि कर्मचारी वर्गाच्या बालकांकरिता (त्यापैकी पुरुष कर्मचारी वर्गासाठी ५० टक्के जागा व स्त्री कर्मचारी वर्गासाठी ५० टक्के जागा असतील) तर उर्वरित ५० टक्के जागा या वनामकृवि कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त असलेल्या कुटुंबियांसाठी राखून ठेवल्या आहेत. असे करत असतांना उपरोक्त उल्लेखित दोन प्रवर्गांच्या ( वनामकृवि कर्मचारी व या कर्मचा-याव्यतिरिक्त असणारे कुंटुंबिय) प्रत्येकी ५० टक्के जागांसाठी प्रवेश देतांना त्यांचे उपप्रवर्ग करण्यात येऊन प्रत्येक प्रवर्गातील ५० टक्के जागा या मुलांसाठी व ५० टक्के जागा या मुलींसाठी राखीव असतील. प्रवेशाच्या वेळी एखाद्या प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्यास उपलब्ध प्रवर्गातून शाळेच्या नियमाने त्या जागा भरण्यात येतील.

- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्याच्या उपरोक्त राखीव जागांव्यतीरिक्त या विद्यापीठातील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या गरजेनुसार कोणत्याही कक्षात दोन जागा राखीव असतील .
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी कर्मचारी प्रवर्गातून प्रवेश अर्ज सादर करावयाचा असल्यास अर्जासोबत कर्मचाऱ्याने स्वतःच्या कार्यालय प्रमुखातर्फे संबधीत कर्मचारी त्यांच्या कार्यालयात सध्या कार्यरत असल्याचे प्रमाण पत्र जोडणे आवश्यक आहे.
- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेत सौम्य पातळीवर विकासात्मक दृष्ट्या कमतरता असलेल्या (Developmentally subnormal) विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या इतर कक्षात त्यांचे विलिनीकरण (Integration) करण्यात येईल. असे नवीन होणारे प्रवेश हे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर आधारित देण्यात येणार असून त्यांच्या प्रवेशाकरिता कोणत्याही प्रवर्गासाठी जागा राखीव ठेवलेल्या नसल्याने या कक्षात विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यासाठी प्रवेश खुला असेल. नवीन प्रवेशासाठी विकासात्मक दृष्ट्या कमतरता असलेल्या बालकांचे या विभागातील बाल मार्गदर्शन व कौटुंबिक समुपदेशन चिकित्सलयात मूल्यमापन केल्यानंतर **बालकांच्या बुद्ध्यांक व स्वास्थ्याच्या स्थिती आधारे त्या बालकांची प्रवेशासाठी पात्रता ठरवण्यात येईल.**
- प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतील दुपारच्या सत्रात असणाऱ्या सीसीएसएफ सेक्शनचा ( Child Care Support to Family) प्रमुख उद्देश हा केवळ बालकांची काळजी व त्यांच्या विकासासाठी मनोरंजनात्मक कार्य घेणे हा आहे. या सेक्शनमध्ये उपलब्ध असलेल्या जागा या गरजू विद्यार्थ्यांना जसे की ज्यांचे दोन्हीही पालक नौकरी / व्यवसाय/ शिक्षण अशा कार्यात व्यस्त असतील अथवा पालकांच्या आजारांमुळे बालकांची काळजी घेण्यात त्यांना समस्या उद्भवत असतील, एक पालक असणारे बालक (Single parent) असेल अशा किंवा इतरही तत्सम सबळ कारणास्तव गरजू पालकांच्या पाल्यासाठी असून या सेक्शन मधील रिक्त जागा प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या निर्धारित नियमाप्रमाणे भरण्यात येतील. तेव्हा या कक्षात उपरोक्त पार्श्वभूमीवर पाल्यास प्रवेश द्यावयाचा असल्यास त्यासंबधीचा पुरावा दर्शवणारी कागदपत्रे प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे या सेक्शनमध्ये सन २०२२-२३ या नवीन शैक्षणिक वर्षात सकाळच्या सत्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी १० जागा राखून ठेवलेल्या आहेत. या कक्षातील उर्वरित जागा शाळेच्या नियमाप्रमाणे भरण्यात येतील.तसेच हा कक्ष देखील जेव्हा प्रा.पू.प्रा.शाळा प्रत्यक्षात सुरू होईल तेव्हाच सुरू करण्यात येईल.
- **सन २०२२-२३ मध्ये प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या सकाळच्या सत्रातील प्ले सेक्शन ( वयोगट २ ते ३ वर्ष) वगळता इतर कक्षातील (बड्स, फ्लॉवर्स व ब्रिज) ज्या जागा पूर्वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर रिक्त राहतील त्याबाबतची माहिती दि. १३ एप्रिल २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार असून त्यासाठी दि. १३ ते २५ एप्रिल २०२२ या कालावधीत शाळेच्या कार्यालयीन दिवशी सकाळी ९.३० ते १.०० व दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत शासनाच्या सर्व निर्देशांचे पालन करून विद्यार्थ्यांची नवीन प्रवेश अर्ज स्वीकारण्यात येतील.**
- **दि. २६ एप्रिल २०२२ रोजी सायंकाळी ४.३० वाजता सामुदायिक विज्ञान महाविद्यालय कार्यालयात प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या प्रवेश समितीतर्फे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात सर्व सेक्शनमध्ये नव्याने प्रवेशीत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी वय निश्चित करण्याकरिता लॉटरी काढण्यात येणार आहे**
- तेव्हा इछुक पालकांनी त्यांच्या पाल्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे व इतर बाबींविषयी काटेकोरपणे जाणून घेवून प्रवेशाच्या सर्व तयारीनिशी प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेत संपर्क साधावा.
- **प्रवेशासंबधी विशेष सूचना**

**विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज सादर करण्यापूर्वी त्यासोबतखालील बाबी असणे आवश्यक आहे.**

**१. जन्म प्रमाणपत्र : नगर परिषद/महानगरपालिका/जिल्हा रुग्णालय/ग्रामपंचायत द्वारे पारीत**

**२. बालकांचे नुकतेच काढलेले दोन पासपोर्ट आकाराचे फोटो**

**३. प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेच्या ज्या सेक्शनसाठी बालकाचे वय योग्य असेल त्या कक्षात त्यास प्रवेश देण्यात येईल.यासाठी ३१ मे २०२२ पर्यन्त बालकाचे वय ग्राह्य धरण्यात येईल. बालकास अशाप्रकारे प्रवेश देत असताना त्यांच्या विकासात्मक क्षमताही विचारात घेऊन याबाबत प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा प्रवेश समितीचा निर्णय अंतिम राहील.**

**४. प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेची निर्धारीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून बालकास या शाळेत प्रवेश मिळाल्यानंतर, बालकांच्या सामान्य विकासाबाबत अथवा शाळेतील वातावरणात समयोजित होण्याबाबत शाळा प्रशासनास काही गैर बाब आढळल्यास त्याची शहानिशा करून अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.**

## सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेचा नियोजित कार्यक्रम

- सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात कोरोना विषाणू संसर्ग सुरू राहिल्यास विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेतर्फे अमलात येणाऱ्या "माझे घर – माझी शाळा" या ऑनलाइन उपक्रमास सर्व विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे. जेणे करून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास निश्चित मदत होईल.
- कार्यदिन : सोमवार ते शुक्रवार ( महिन्यातील प्रत्येक शनिवारी व रविवारी शाळेस सुट्टी असेल तसेच सर्व शासकीय व विद्यापीठातर्फे जाहीर सुट्याच्या दिवशी शाळा बंद असेल. )
- प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी पालकांना त्यांच्या पाल्यासंबधी जाणून घेण्यासाठी शिक्षिकांशी संपर्क करता येईल.
- कोरोना प्रकोपातून परिस्थिति सामान्य झाल्यानंतर शाळा प्रत्यक्षात सुरू झाल्यास विद्यार्थ्यांना प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेचा गणवेश अनिवार्य आहे.

### प्ले सेक्शनच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबधीचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| नवीन प्रवेश अर्ज स्वीकारण्याचा कालावधी | दि. १ ते २१ एप्रिल २०२२ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम यादी प्रदर्शित करून शुल्क स्वीकारण्याचा कालावधी (प्ले सेक्शन) | दि. २९ एप्रिल ते ४ मे २०२२ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची द्वितीय यादी प्रदर्शित करून शुल्क स्वीकारण्याचा कालावधी (प्ले सेक्शन) | दि. ५ मे ते १० मे २०२२ |

### बड्स,फ्लॉवर्स व ब्रिज सेक्शनच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशसंबधीचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| नवीन प्रवेश अर्ज स्वीकारण्याचा कालावधी | दि. १८ ते २५ एप्रिल २०२२ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम यादी प्रदर्शित करून शुल्क स्वीकारण्याचा कालावधी | दि. २९ एप्रिल ते ४ मे २०२२ |
| नवीन प्रवेश अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची द्वितीय यादी प्रदर्शित करून शुल्क स्वीकारण्याचा कालावधी | दि. ५ मे ते १० मे २०२२ |

### प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जासोबत आवश्यक असणाऱ्या बाबी

- **विशेस सूचना : प्रवेस अर्जा सोबत खालील कोणत्याही कागदपत्राच्या मुळप्रती स्वीकारण्यात येणार नसून त्यांच्या साक्षांकीत झेरॉक्स प्रती जोडणे अनिवार्य आहे .**
- **विद्यार्थ्यांचे ....**
  - **जन्म प्रमाणपत्र / नगर परिषद /महानगरपालिका / जिल्हा रुग्णालय/ग्रामपंचायतद्वारे पारीत**
  - **नुकतेच काढलेले २ पासपोर्ट आकाराचे फोटो**
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी कर्मचारी प्रवर्गातून प्रवेश अर्ज सादर करावयाचा असल्यास अर्जासोबत कर्मचाऱ्याच्या कार्यालय प्रमुखांतर्फे संबंधीत कर्मचारी त्यांच्या कार्यालयात सध्या कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र.
- विकासात्मक कमतरता असलेल्या बालकांना (Developmentally subnormal)प्रवेश द्यावयाचा असल्यास उपरोक्त बाबींबरोबरच संबंधित बालकांचा या महाविद्यालयाच्या मानव विकास व कौटुंबिक अभ्यास तर्फे देण्यात आलेला विभागातील बाल मार्गदर्शन व कौटुंबिक समुपदेशन चिकित्सालयाचा मूल्यमापन अहवाल.
- दुपारच्या सत्रातील सीसिएसएफ सेक्शनमध्ये (Child Care Support to Family ) विद्यार्थ्यास प्रवेश द्यावयाचा असल्यास उपरोक्त बाबींबरोबराच त्याचे /तिचे दोन्ही पालक नोकरी/व्यवसाय/ शिक्षण अशा कार्यात व्यस्त आहेत अथवा पालकांच्या आजारामुळे बालकांची काळजी घेण्यात त्यांना समस्या उद्भवत आहेत. एक पालक असणारे बालक (Single parent) आहे अथवा अशी इतर सबळ कारणे असल्याचा पुरावा दर्शवणारी कागदपत्रे.
- प्रा.पू.प्रा.शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्यानंतर त्यांना व त्यांच्या पालकांना या शाळेच्या निर्धारित नियमांचे पालन करावे लागेल. प्रा.पू.प्रा.शाळेचे विहीत शपथपत्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी पालकांना सादर करावे लागेल.

**आराखडा अ**

# प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा

## सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात सामान्य परिस्थितीत(कोरोना विषाणू संसर्ग नसल्यास) प्रस्तावित सेक्शन्स व शैक्षणिक शुल्क

| अ. क्र. | प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा सेक्शन | वयोगट | प्रत्यक्षात शाळा सुरु असतांना शाळेची वेळ | निर्धारीत जागा | प्रा.पू.प्रा. शाळेचे पात्र विद्यार्थी | उर्वरीत जागा | सत्रनिहाय शुल्क (रुपये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प्रथम सत्र अंदाजे जून २०२२ | द्वितीय सत्र नोव्हेंबर २०२२ |
| १ | प्ले सेक्शन (१००% अनौपचारीक शिक्षण) | २ ते ३ वर्षे | ९.३० ते १२.३० | ३० (प्रत्येकी १५ विद्यार्थ्यांचे दोन गट) | निरंक | ३० | ६००० + नोंदणी शुल्क रु. २०० | ६००० |
| २ | बड्स सेक्शन | ३ ते ४ वर्षे | ९.३० ते १२.३० | ३० | ३० | निरंक | ६००० + नोंदणी शुल्क रु. २०० | ६००० |
| ३ | फ्लॉवर्स सेक्शन | ४ ते ५ वर्षे | ९.३० ते १.३० | ३० | ३० | निरंक | ७००० + नोंदणी शुल्क रु. २०० | ७००० |
| ४ | ब्रिज सेक्शन | ५ ते ६ वर्षे | ९.३० ते १.३० | ३० | ३० | निरंक | ७००० + नोंदणी शुल्क रु. २०० | ७००० |
| ५ | सीसीएसएफ सेक्शन (Child Care Support to Family) (विकासात्मक कार्ये, आहार व विश्रांती) | २ ते ८ वर्षे | २ ते ४.३० | २० | • सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशीत इच्छुक विद्यार्थ्यांसाठी -१० <br> • सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील सकाळच्या सत्रातील गरजु विद्यार्थ्यांसाठी- १० | निरंक | ६००० + नोंदणी शुल्क रु. २०० | ६००० |
| ६ | विकासात्मक दृष्ट्या कमतरता असणारे विद्यार्थी | वयोगट ३ ते १० वर्षे | ९.३० ते १२.३० | ८ | १ | ५ | ६००० + नोंदणी शुल्क रु. २०० | ६००० |

- **नोंदणी शुल्क : सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रामध्ये प्रवेश घेतांना संबंधीत कक्षाच्या प्रथम सत्र शुल्कासोबत रु. २००/- नोंदणी शुल्क असेल.**

**आराखडा ब**

## प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा
## कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवरील सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील प्रस्तावित सेक्शन्स व शैक्षणिक शुल्क/सत्र

| अ. क्र. | प्रायोगिक पूर्व प्राथमिक शाळा सेक्शन | वयोगट (वर्षे) | कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवरील निर्धारीत जागा | सामान्य परिस्थितीत आकारले जाणारे एकुण शुल्क/ सत्र (रु.) | कोरोना विषाणू ससंर्गामुळे ऑनलाईन वर्ग सुरु राहिल्यास २५ % सवलत दिल्यामुळे जमा करावयाचे शुल्क/सत्र (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्ले सेक्शन (१००% अनौपचारीक शिक्षण) | २ ते ३ | ३० | ६२०० | ४७०० |
| २ | बड्स सेक्शन | ३ ते ४ | ३० | ६२०० | ४७०० |
| ३ | फ्लॉवर्स सेक्शन | ४ ते ५ | ३० | ७२०० | ५४५० |
| ४ | ब्रिज सेक्शन | ५ ते ६ | ३० | ७२०० | ५४५० |
| ५ | विकासात्मक दृष्ट्या कमतरता असणारे विद्यार्थी | ३ ते ८ | ८ | ६२०० | ४७०० |

- **विशेष सुचना : सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रास प्रवेश घेण्यासाठी शाळा प्रशासनाने सामान्य परिस्थितीत ( कोरोना विषाणू संसर्ग नसल्यास) प्रस्तावित केलेले शुल्क कार्यालयात जमा करावे लागेल.**

सहयोगी प्राध्यापक
प्रा.पू.प्रा.शा-समन्वयिका (वित्त)
सा.वि.म, वनामकृवि, परभणी

विभाग प्रमुख (मा.वि.व कौ.अ)
प्रा.पू.प्रा.शा.- प्रमुख समन्वयिका
सा.वि.म, वनामकृवि, परभणी

सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय
वनामकृवि, परभणी